दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • मंगळवार दि.२८ जुलै २०२६ • अंक-१७० • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

### गोकुळची निवडणूक लढवणार नाही

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी गोकुळ दूध संघाच्या आगामी निवडणुकीबाबत मोठी घोषणा केली आहे. मी गोकुळची निवडणूक लढवणार नाही आणि यापुढे गोकुळचा चेअरमनही राहणार नाही. आता कार्यकर्त्यांना संधी देण्याची वेळ आली आहे, असे स्पष्ट करत त्यांनी सहकार क्षेत्रात नव्या नेतृत्वाला संधी देण्याचे संकेत दिले. कोल्हापुरात पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. जिल्हा मध्यवर्ती बँकेबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय आपण घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यवतमाळमध्ये कर्जमाफीच्या यादीत नाव न आल्याने एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याच्या घटनेवर हसन मुश्रीफ यांनी दुःख व्यक्त केले.

# मोदी सरकारनं शब्द दिला,पण अवघ्या २ दिवसांत फिरवला; सीजेपी कडून पुन्हा आंदोलनाचा इशारा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**
कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांनी मोदी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. सीजेपी सोबत झालेल्या कराराचं उल्लंघन करण्यात आल्याचा दावा रांका यांनी केला आहे. आंदोलकांविरोधात कोणतीही पोलिसी कारवाई करणार नसल्याचा विश्वास सरकारनं दिला होता. तसं आश्वासनही सरकारकडून देण्यात आलं होतं. पण बिहार, पश्चिम बंगाल, दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये विद्यार्थी आणि सीजेपीच्या स्वयंसेवकांविरोधात कारवाया सुरू असल्याचा दावा रांका यांनी केला आहे.बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना अटक करण्यात आलेली आहे. तर दिल्ली आणि अन्य राज्यांमध्ये आंदोलनाशी संबंधित लोकांवर नजर ठेवली जात आहे. त्यांना त्रास दिला जात आहे, असं रांका यांनी म्हटलं. दिल्लीतील सीजेपीच्या आंदोलनाला रसद पुरवठा करणाऱ्या अनेक स्वयंसेवकांना ताब्यात घेण्यात आल्याचाही दावा रांका यांनी केला.आंदोलकांविरोधात दाखल करण्यात आलेल्या सगळ्या एफआयआर तातडीनं मागे घ्या. अटक करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची बिनशर्त सुटका करा आणि भविष्यात दिल्ली पोलीस, केंद्रीय तपास यंत्रणा आणि भाजपशासित राज्यांतील पोलिसांनी कोणत्याही आंदोलकाविरोधात नवीन गुन्हा दाखल करू नये, अशी मागणी सीजेपीनं केली आहे. आंदोलन मागे घेताना सरकारसोबत झालेल्या कराराचा हाच मूळ गाभा होता, याची आठवण सीजेपीनं करून दिली आहे.कायदेशीप प्रकरणांशी संबंधित लेखी करार आणि भारत सरकार सोबत निश्चित करण्यात संपूर्ण टाईमलाईन २४ तासांच्या आत सार्वजनिक करून आमच्या संघटनेला उपलब्ध करून घ्या, अशी मागणी रांका यांनी केली आहे. सरकार आपल्या आश्वासनांबद्दल किती गंभीर आहे, हे यातून स्पष्ट होईल, असं रांका यांनी म्हटलं आहे. सरकारनं मागण्यांसंदर्भात तात्काळ कारवाई न केल्यास आणि करारांचं पालन करण्याबद्दल कटिबद्धता न दर्शवल्यास संघटना पुन्हा एकदा मोठ्या आणि व्यापक प्रमाणावर आंदोलन करेल, असा निर्वाणीचा इशारा रांका यांनी दिला आहे. अद्याप तरी सरकार किंवा संबंधित यंत्रणांनी या आरोपांवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.




## अनुसूचित जातींच्या आरक्षणाला धक्का लावल्यास याद राखा; सुधागड तालुक्यात आरपीआयचा एल्गार, पालीत भव्य मोर्चा



**पाली । प्रतिनिधी**
अनुसूचित जातींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सुधागड तालुक्याच्या वतीने सोमवारी (दि. २७) पाली येथे तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. जोरदार घोषणाबाजी करत तहसीलदार आणि पोलिस प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला.निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय तसेच समानतेची हमी दिली असून अनुसूचित जातींच्या संरक्षणासाठी विविध घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. दीर्घ संघर्षानंतर अनुसूचित जाती समाजाला आरक्षणाचा घटनात्मक अधिकार मिळाला आहे. अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय समाजात मतभेद निर्माण करणारा, सामाजिक ऐक्यावर परिणाम करणारा आणि अनुसूचित जातींच्या एकात्मतेला बाधा आणणारा ठरू शकतो, अशी भूमिका आरपीआय (आठवले)च्या वतीने मांडण्यात आली. तसेच महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या मोर्चात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचेजिल्हा संपर्कप्रमुख राहुल भाई सोनावाले,रवींद्रनाथ ओव्हाळ कोकण संघटक आर पी आय , सुधागड तालुका बौद्धजन पंचायतीचे तालुका अध्यक्ष दीपक पवार, आरपीआयचे सुधागड तालुका अध्यक्ष भगवान शिंदे, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते प्रभाकर गायकवाड, बहुजन विद्यार्थी संघटना व आरपीआयचे अमित गायकवाड, आरपीआयचे माजी तालुका अध्यक्ष सुरेश जाधव, सुनील गायकवाड, के. टी. गायकवाड, नितेश गायकवाड, राहुल कांबळे, रोहिणी जाधव, संजीवनी जाधव, बौद्धजन पंचायतीचे माजी अध्यक्ष जे. एस. कांबळे, रवींद्रनाथ ओवाळ, राहुल महाडिक, यशवंत गायकवाड यांच्यासह अनेक ज्येष्ठ पदाधिकारी व निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे पोलिसांना झाले तरी काय? पोलिसांचं दरोडेखोर झाले तर सर्व सामान्यांनी करावे तरी काय?

**पुणे । रमेश जयस्वाल**
**।।। पुणे पोलीसांचा कारनामा अनेक क्षेत्रात दिसत आहे ।।। यावर निर्बंध आणणार तरी कोण ।।। एक पत्रकार , दोन पोलिसांसह सहा जण या प्रकरणी फरार।।। पोलिसांच्या नितिमत्तेवर बोट दाखविण्याचा प्रकार ।।। पुण्यात हा प्रकार थांबविणार तरी कोण ।।।**



पुणे शहरात पोलीस आयुक्त म्हणून अमितेश कुमार यांची नियुक्ती झाल्या नंतर यांनी पोलीस ठाण्यात अर्तंगत चालणारे अवैध धंद्यावर लगाम लावलेले असले तरी पोलीस ठाण्यातील अधिकारी सह आणि ईतर वरिष्ठ अधिकारी यांना पुर्वी तोंडाला रक्त लागलेले असल्या कारणाने यांचे कारणामे थांबत नसल्याचे चित्र आहे . लहान लहान पोलीस ठाण्यात येणारे तक्रारीवर ही यांची वसूली केली जात असल्याचे चित्र पुणे शहरासह ग्रामीण विभागात दिसत आहे . शासन पोलीस विभागातील कर्मचा-यांना पगार आणि सर्व सुविधा देत असतांनाही यांचे पगारावर भागत नसल्याचा प्रकार पुढे येत आहे .


पुणे शहरात पोलीसा कडून कारवाई केली जाणार म्हणून अनेक पोलीस ठाण्यातील कर्मचारी अर्थकारणात गुतंलेले दिसत आहे हाच प्रकार पहावा पोलिसांचे एक कोटी दरोडा प्रकरण पुढे आले आहे सिंहगड रस्त्यावरील ब्रम्हा हॉटेल ते खेड शिवापुर पोलिस चौकी दरम्यान भरदिवसा एका व्यापा-या कडून एक कोटी रूपये हिसकाविण्या प्रकार पोलीसांनी केला . १८ जुलै २०२६ रोजी व्यवसायिक हर्षवर्धन पवार आणि त्यांचे सहकारी किरण आपटे यांनी आपल्या सोबत एक कोटी रूपये कार मध्ये सोबत घेतले होते ते पैसे बॅकेत भरण्यासाठी जात होते . यावेळी पोलीस असल्याचे बतावणी करून यावेळी आपल्या वाहनांची तपासणी करावयाची करत एक कोटी रूपयांची बॅग हिसकाविण्याचा प्रयन्त केला. यात हर्षवर्धन पवार यांनी दाखविलेले धाडसामुळे हा प्रकार फसला. या प्रकरणी न-हे पोलिसांनी जलदगतीने तपास करत दहा आरोपींवर गुन्हे दाखल केले . या आरोपीमध्ये स्वतः:च्या पोलिस विभागातील कर्मचा-यांचा समावेश असल्याचे दिसले यावर कोणाचाही दबाव न बाळगता यांनी धाडशी कारवाई केलेली दिसत आहे . या प्रकरणात एक कथित पत्रकार याला अटक करण्यात आलेली आहे . या पत्रकारांचे नाव आशिष तिवारी ( वय ३९ , राहणार कुदळे पाटील नगर , सिंहगड रस्ता ) या प्रकरणी गुन्ह्याचा तपास करत सीसीटिव्ही फूटेज तपासले. यामध्ये हर्षवर्धन पवार यांच्या कारचा पाठलाग आशिष तिवारी हा दुचाकी वरून करतांना दिसला . याला अटक केल्यानंतर न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने २७ जुलै पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे . यात या पत्रकारांचे लागे बांधे अनेक प्रकरणात पुढे येणार असल्याचे वृत्त आहे .पोलिसांनी या पत्रकारासह चार आरोपींना अटक केली आहे .यातील सहा आरोपी फरार झालेले आहे .यामधील राजगड पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक अजिज जब्बार इसुब मेस्त्री, वय ३९ , नेमणूक राजगड पोलिस ठाणे , महिला पोलिस अंमलदार प्रमिला शरद निकम, वय ४४ ,राहणार विसावा कॅम्प, सातारा या पोलिसांचा सहभाग आहे .हे दोन्ही फरार आहे यातील अभिजीत ऊर्फ बट-या बाळासाहेब गाडे. ( धायरी) , दाऊद सय्यद नदाफ ( धायरी), आकाश ऊर्फ मुन्ना संजय गायकवाड ( कासुर्डी भोर ) , प्रमोद विजयकुमार यादव (, गाउडदरा फाटा हवेली ) हे सुद्धा फरार आहे .यात अनेक लोकांचा सहभाग असल्याचे वृत्त आहे . हे फार दिवसांपासून अनेक प्रकरणे करत होते परंतू अनेकांनी याची तक्रारचं केलेली नव्हती आता हे या प्रकरणात गुंतल्या मुळे अनेक प्रकरणे पुढे येऊन तक्रारी वाढणार आहे . पुणे शहरासह ईतर ग्रामीण विभागातील पोलिस ठाण्या अंतर्गत पोलिसांचा लाचखोरी प्रकार पुढे येत आहे . यावर लगाम लावणार तरी कोण ? पुणे पोलीस आयुक्तांनी यावर विचार करत सखोल पावले उचलणे गरजेचे आहे ज्या पोलीस ठाण्यात अंतर्गत पोलीस कर्मचा-यांनी असा लाचखोरीचा प्रकार केल्यास पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरिक्षकावर स्कठोर कारवाई केली तर हा प्रकार घडणार नाही .

# फॅशन डिझायनर आयेशा शेट्टीची वाढती प्रगती

## फॅशनचा सुंदर संगम: 'यशना कलेक्शन'ने दोन वर्षे पूर्ण केली

फॅशन जगताला भारतीय परंपरा आणि आधुनिक फॅशनचा सुंदर संगम सादर करणाऱ्या प्रसिद्ध फॅशन डिझायनर आयेशा शेट्टी यांच्या 'यशना कलेक्शन'ने मुंबईतील इनॉर्बिट मॉलमध्ये सुंदर साड्यांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. १६ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या विशेष कार्यक्रमात, भारतीय परंपरा आणि आधुनिक फॅशनचा सुंदर समतोल साधणाऱ्या महिलांसाठी पारंपरिक भारतीय साड्यांपासून ते डिझायनर आणि हस्तनिर्मित साड्यांपर्यंत एक सुंदर श्रेणी सादर करण्यात आली आहे. या साड्या विविध प्रसंग आणि महिलांच्या पसंती लक्षात घेऊन तयार करण्यात आल्या आहेत. गोरेगाव पश्चिम, आझाद नगर येथील वैभव बिल्डिंगमधील दुकान क्रमांक २४ मध्ये असलेल्या 'यशना कलेक्शन' या साडीच्या दुकानाने दोन वर्षे पूर्ण केली आहेत. अल्पावधीतच यशना कलेक्शनने साडीप्रेमींमध्ये एक विशेष ओळख निर्माण केली आहे. यश्ना कलेक्शनमध्ये वधूच्या साड्या, बनारसी सिल्क साड्या, कांजीवरम सिल्क साड्या, कस्तुरी पारंपरिक सिल्क साड्या, क्लासिक हातमाग साड्या, जरी साड्या, जॉर्जेट साड्या, डिझायनर साड्या आणि हस्तनिर्मित साड्या उपलब्ध आहेत. वधू संग्रह, बनारसी सिल्क संग्रह, कांजीवरम संग्रह, कस्तुरी सिल्क संग्रह, हातमाग संग्रह, जरी संग्रह, जॉर्जेट संग्रह, डिझायनर साडी संग्रह आणि हस्तनिर्मित साडी संग्रह हे देखील ग्राहकांसाठी एक विशेष आकर्षण आहे. यश्ना कलेक्शनचे सौंदर्य आणि वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन्स केवळ दुकानापुरते मर्यादित नाहीत. त्यांच्या डिझायनर साड्या रॅम्प शो आणि फॅशन वॉकमध्येही प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. अलीकडेच, चंदीगडमध्ये आयोजित एका फॅशन शोमध्ये, यश्ना कलेक्शनच्या साड्यांनी त्यांच्या सौंदर्याने आणि आकर्षक डिझाइन्सने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याव्यतिरिक्त, यश्ना कलेक्शनच्या साड्या मुंबईतील घाटकोपर येथेही प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. ग्राहक फॅशन आणि परंपरेचा हा सुंदर संगम ऑनलाइन सहजपणे शोधू शकतात. तुम्ही यश्ना कलेक्शनच्या वेबसाइटवरून तुमची आवडती साडी ऑनलाइन ऑर्डर करू शकता. तुमची आवडती साडी ऑर्डर करण्यासाठी तुम्ही इंस्टाग्रामवर कलेक्शन पाहू शकता. फॅशन डिझायनर आयेशा शेट्टी आता यशना कलेक्शनचा आणखी विस्तार करण्यासाठी काम करत आहेत. नवीन फॅशन ट्रेंड्ससोबत भारतीय साडीचे सौंदर्य आणि समृद्ध परंपरा देशभरातील महिलांपर्यंत पोहोचवणे, हे त्यांचे ध्येय आहे. म्हणूनच यशना कलेक्शन लग्न, कौटुंबिक मेळावे, सण आणि इतर विशेष प्रसंगांसाठी साड्यांची एक सुंदर श्रेणी सादर करते. आयेशा शेट्टी म्हणतात, यशना कलेक्शनला भेट देणाऱ्या प्रत्येक महिलेला तिच्या आवडीनुसार आणि व्यक्तिमत्त्वानुसार तयार केलेली, काहीतरी अद्वितीय वस्तू मिळावी, हे सुनिश्चित करणे हेच माझे नेहमी ध्येय असते. प्रत्येक स्त्रीची साडी नेसण्याची स्वतःची एक खास शैली असते आणि मला वाटते की आमच्या कलेक्शनने त्यांना ही शैली जगासमोर अधिक सुंदरपणे सादर करण्यास मदत करावी. भविष्यात यशना कलेक्शनला आणखी मोठ्या उंचीवर नेण्याचे माझे स्वप्न आहे.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**




# धुक्याच्या दुलईत हरवले 'राणीचे नंदनवन' पावसाळ्यात पर्यटकांनी फुलले माथेरान!


**कर्जत । जयेश जाधव**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आशियातील एकमेव वाहनमुक्त पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानने पावसाळ्यात पुन्हा एकदा हिरवागार शालू परिधान केला आहे. दाट धुक्याची चादर, कोसळणारे शुभ्र धबधबे, हिरवाईने नटलेले डोंगर, थंडगार वाऱ्याची झुळूक आणि निसर्गाचा मनमोहक आविष्कार अनुभवण्यासाठी राज्यभरातून पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानकडे धाव घेत आहेत. विशेषतः शनिवार-रविवार आणि सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून बाजारपेठ, पॉईंट्स आणि घोडेस्वारीच्या ठिकाणी उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

शार्लोट तलाव, इको पॉईंट, लुईसा पॉईंट, वन ट्री हिल, पॅनोरमा पॉईंट आणि सनसेट पॉईंट परिसरात पर्यटक निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटताना दिसत आहेत. सकाळच्या वेळी संपूर्ण माथेरान परिसर धुक्याने वेढला जात असल्याने प्रत्येक दृश्य मनाला मोहून टाकणारे ठरत आहे. सोशल मीडियासाठी छायाचित्रे आणि व्हिडिओ टिपण्यासाठीही पर्यटकांची मोठी लगबग सुरू आहे.

माथेरानमधील स्थानिक व्यावसायिक, हॉटेल चालक, घोडेमालक, हातगाडी चालक आणि लहान-मोठे व्यापारी यांच्यातही समाधानाचे वातावरण आहे. पावसाळी पर्यटनामुळे स्थानिक अर्थचक्राला चांगली चालना मिळत असून व्यवसायात वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, मुसळधार पाऊस आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सेवा सध्या बंद ठेवण्यात आली असून अमन लॉज ते माथेरान




शटल सेवा सुरू आहे. त्यामुळे अनेक पर्यटक अमन लॉजपर्यंत वाहनाने जाऊन तेथून पुढे पायी, घोड्यावर किंवा हातरिक्षाच्या माध्यमातून माथेरानमध्ये प्रवेश करत आहेत.

प्रशासनाने पर्यटकांना दरीच्या कडेला जाऊन सेल्फी न काढण्याचे, घसरड्या ठिकाणी काळजी घेण्याचे, अधिकृत सूचना पाळण्याचे तसेच हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच प्रवास करण्याचे आवाहन केले आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे काही ठिकाणी घसरडी परिस्थिती निर्माण होत असल्याने खबरदारी घेणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.


यंदाच्या पावसाळ्यात माथेरानचे निसर्गरम्य रूप पर्यटकांना अक्षरशः भुरळ घालत असून, रायगड जिल्ह्याच्या पर्यटनाला नवसंजीवनी मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. येत्या काही आठवड्यांत पावसाचा जोर कायम राहिल्यास पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे.

# समाज सेवक श्रीराम नामदेव पाटील एक मसीहा

## अनेकांचे जीव वाचवत समाजसेवा केली

**पनवेल । प्रतिनिधी**

मी श्रीराम नामदेव पाटिल हे मोरवे गावचे रहिवाशी असून उलवे नोड येथे प्रकल्प गस्त कायमस्वरूपी आहेत. त्यांचा बोटीचा व्यवसाय असून त्यांनी अनेकाना मदतीचा हात दिला आहे. १९८८ मध्ये शिवाजी नगर ते बी आर सी पाईप लाईन चे काम चालू होते. समुद्रात पाईप लाईन टाकण्याचे काम श्रीराम पाटील यांच्या भाग्यलक्ष्मी मच्छिमार बोटीच्या माध्यमातून केले जात होते. त्याचवेळी प्रवासी बोट शिवाजीनगर वरून एसारची कॉलनी येथे प्रवासी घेऊन जात असताना बोटी चालकाचा सहायक ( क्लिनर ) पाण्यात पडला असता. त्याला श्रीराम नामदेव पाटील यांनी बुडता बुडता वाचवले. तसेच श्रीराम पाटील दिवाळे गावावरून डेजर फिटर घेऊन येत असताना स्टील लॉन्च दगडावर आदळून बोटीचा खलाशी पाण्यात बुडून डोळीत पडणार तेवढ्यात त्याला वाचविण्यासाठी बोट घेऊन जाऊन त्याला वाचवीले,मोरावे गावच्या बाजूला असलेल्या अंबुजा कंपनी मध्ये श्रीराम पाटील यांची जयलक्ष्मी बोट सिग्नल कामासाठी न्हावा खाडी ग्रीन सिग्नल जवळ नांगर टाकून उभी असताना अचानक वादळ सुरू झाले आणि त्यात दिवाळे येथील राजू कोळी आणि त्यांचा लहान भाऊ हरेश कोळी यांची बोट बुडाली. त्या दोन्ही भावांना श्रीराम पाटील यांनी आपली बोट घालून वाचविले आणि यांना दोघांना दिवाळे गावात सुखरूप घरी पोहचविले त्याचप्रमाणे अंबुजा कंपनी जेटिवर पाटील यांची बोट बोया चेक करण्यासाठी गेली असता



कंपनीचे अधिकारी भंडारी यांचा जेटीवर चढत असताना तोल जाऊन पाय घसरून पाण्यात पडत असताना त्यांना कोणतीही पर्वा न करता वाचवले.

जे एन पी टी मध्ये आय टी डी सी सीमेंट कंपनी मध्ये श्रीराम पाटील यांची स्टील बोट सद्गुरु कृपा ही कार्यरत असताना न्हावा ते घारापुरी असे प्रवासी घेऊन जाणारी लाकडाची बोट ओहटीच्या पाण्याची धार जास्त असल्याकारणाने बोट चालकाला बोटीचे नियंत्रण न झाल्याने बोट दगडावर जोरदार आदळली आणि बोटीची फली तुटल्या कारणाने बोट बुडणार हे लक्षात येताच श्रीराम पाटील यांनी ताबडतोब आपली सदगुरु कृपा ही स्टील बोट काढून प्रवाशांना वाचविले. त्याच बरोबर बोट चालक राजा पडते यांचे लहान भाऊ मनोज पडते यांना वाचविले. तसेच श्रीराम पाटील यांची सदगुरु कृपा ही बोट बांद्रा येथे हाजीअली येथे सर्वेसाठी गेली असता त्याचवेळी फ्लोटिंग हॉटेल बुडालेले होते त्यावेळी पाटील यांनी आपल्या बोटीच्या माध्यमातून मोठी मदत झाली. तसेच २०१९ ते २०२२ मध्ये सागरी पोलिस कवचसाठी श्रीराम पाटील यांनी ३ लाकडी ट्रॉलर सागरी सुरक्षासाठी देऊन पोलिसाना चांगल्या प्रकारची मदत केली. तसेच पनवेल खाडीमध्ये तहसीलदार विजय तलेकर, तलाठी सर्कल यांच्याकडून अनधिकृत धंद्यांचा बीमोड करण्यासाठी पाटील यांच्या बोटींचा मोठा वापर करण्यात आला, २०२२ मध्ये आगरी कोळी मेळाव्यामध्ये श्रीराम पाटील यांनी आपला जीव धोक्यात घालून अनेकांचे जीव वाचविले. त्यांनी विविध कामांसाठी योगदान दिले म्हणून सागरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीकांत धरणे साहेब व डी सी पी मिसेस रूपाली अंबरे यांनी त्यांना पुष्प गुच्छ शाल सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले.

# महसूल अधिकाऱ्याच्या अटकेने रायगडमध्ये खळबळ!

## तहसीलदार–नायब तहसीलदार संघटना आक्रमक; २७ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

### पोयनाड पोलिसांच्या कारवाईचा तीव्र निषेध;अटक केलेल्या अधिकाऱ्याची तातडीने सुटका व गुन्हा रद्द करण्याची मागणी

**अलिबाग । ओमकार नागावकर**

पोयनाड पोलीस ठाण्यात दाखल एफआयआर क्र. ००८३/२०२६ प्रकरणात महसूल विभागातील मंडळ अधिकारी रविदास सदुसिंग जाधव यांना कोणतीही पूर्वकल्पना न देता थेट अटक करण्यात आल्याने रायगड जिल्ह्यातील महसूल विभागात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईचा तीव्र निषेध करत तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने आता आक्रमक भूमिका घेतली असून, मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास २७ जुलै २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.पोयनाड पोलिसांनी महसूल विभागातील मंडळ अधिकारी रविदास जाधव आणि ग्राम महसूल अधिकारी सतीश भानुदास ढवळे यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. यापैकी जाधव यांना थेट अटक करण्यात आली असून, ढवळे यांनाही अटक करू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे. शासकीय कर्तव्य बजावत असताना महसूल अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करून अटक करण्याची पद्धत चुकीची असून, यामुळे महसूल कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.महसूल अधिकाऱ्यांनी केलेले कामकाज हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत त्यांच्या अधिकृत शासकीय कर्तव्याचा भाग असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. शासकीय कामकाजात हलगर्जीपणा किंवा चुकीचे काम झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार विभागीय अथवा प्रशासकीय कारवाईची तरतूद असताना थेट पोलिसांकडून फौजदारी कारवाई करून अटक करण्यात आल्याने संघटनेने या कारवाईवर गंभीर आक्षेप नोंदविला आहे.तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या अर्नेश कुमार प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असलेल्या प्रकरणांमध्ये थेट अटक करण्याऐवजी चौकशीची प्रक्रिया आणि आवश्यक ती नोटीस देणे अपेक्षित असल्याचे संघटनेने म्हटले आहे. मात्र, सदर प्रकरणात कोणतीही तांत्रिक अथवा महसुली चौकशी न करता थेट अटक करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

**महसुली वादासाठी थेट फौजदारी कारवाई का?**

महसुली फेरफार अथवा सातबारा उताऱ्यावरील नोंदींबाबत आक्षेप असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत उपलब्ध असलेल्या अपीलीय प्रक्रियेचा अवलंब करता येतो. मात्र, या प्रक्रियेचा अवलंब न करता थेट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करून महसूल अधिकाऱ्यांना अटक करण्याचा पायंडा पडत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.महसूल अधिकाऱ्यांना अशा प्रकारे थेट अटक होत राहिल्यास भविष्यात अधिकारी आणि कर्मचारी निर्भयपणे शासकीय कर्तव्य बजावू शकणार नाहीत, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

**संघटनेच्या प्रमुख मागण्या**

* मंडळ अधिकारी रविदास सदुसिंग जाधव यांच्या अटकेच्या कारवाईचा जिल्हाधिकारी स्तरावरून तातडीने फेरविचार करावा.
* गुन्हा क्र. ००८३/२०२६ रद्द करून श्री. जाधव यांची तातडीने मुक्तता करावी.
* ग्राम महसूल अधिकारी सतीश भानुदास ढवळे यांना अटक करू नये.
* सदर प्रकरणाचा तपास पोयनाड पोलीस ठाण्याकडून काढून उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावा.
* तपासात जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांचे तांत्रिक अभिप्राय समाविष्ट करावेत.
* पदाचा दुरुपयोग करून थेट अटकेची कारवाई करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

**मागण्या मान्य न झाल्यास २७ जुलैपासून ‘कामबंद’!**

दरम्यान, या सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास रायगड जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व नायब तहसीलदार २७ जुलै २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करतील, असा स्पष्ट इशारा तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने दिला आहे.या आंदोलनाला महसूल कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी आणि महसूल सेवक संघटनांचा पाठिंबा मिळणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आंदोलनामुळे शासकीय कामकाज आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर परिणाम झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलीस विभाग व संबंधित प्रशासनाची राहील, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

महसूल अधिकाऱ्यांवरील थेट पोलीस कारवाईचा मुद्दा आता चिघळण्याची शक्यता असून, २७ जुलैपासून रायगडमध्ये महसूल प्रशासन ठप्प होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## दिव्यातील लक्ष्मी वृद्धआश्रमात फळवाटप करून सिद्धार्थ भोकरे यांचा वाढदिवस साजरा

**ठाणे । संतोष पडवळ**

महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा शहरातील लक्ष्मी वृद्धाआश्रमात फळे वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदर वृद्धाआश्रमातील सर्वांना फळांचे वाटप करून वाढदिवस अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सिद्धार्थ भोकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपणारे असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया ठाणे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ठाणे शहर सचिव



संतोष पडवळ, डिजिटल मीडियाचे कार्याध्यक्ष हनुमंता जगताप, राहुल जोगदंड आदी पदाधिकारी तसेच रोहित जाधव, नितीन डोईफोडे व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी आश्रमातील रहिवाशांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ३६ कोपरखैरणेगाव शाळेत आषाढी एकादशीचा उत्सव संपन्न

## ठाण्याच्या जलतरणपटूंची स्वित्झर्लंडमध्ये ऐतिहासिक कामगिरी;भारताला प्रथमच रौप्यपदक

**ठाणे । संतोष पडवळ**

स्वित्झर्लंडमधील झुरिच लेक येथे झालेल्या ३८व्या श्री चिन्मय स्विम मॅरेथॉन स्पर्धेत ठाण्याच्या तीन युवा जलतरणपटूंनी भारताला प्रथमच रौप्यपदक मिळवून देत इतिहास घडविला. या यशाबद्दल कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ड. निरंजन डावखरे यांच्या हस्ते जलतरणपटू आणि प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

ठाणे महानगरपालिकेच्या कै. मारोतराव शिंदे जलतरण तलावात सराव करणाऱ्या आणि ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेशी संलग्न स्टारफिश स्पोर्ट्स फाउंडेशनच्या कु. आयुषी कैलास आखाडे, कु. समीप्ता गणेश वाव्हळ आणि कु. सुयश प्रियांका हिंदळेकर यांनी २६ किलोमीटरच्या वेटसूट सांघिक प्रकारात अवघ्या ८ तास ७ मिनिटांत




अंतर पूर्ण करत भारतीय संघाला ऐतिहासिक रौप्यपदक मिळवून दिले. रॅपर्सव्हिल ते झुरिख या खुल्या पाण्यातील स्पर्धेत मुसळधार पाऊस, जोरदार वारे आणि १२ ते १३ अंश सेल्सिअस तापमानाच्या थंड पाण्याचा सामना करत या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. दहा आंतरराष्ट्रीय संघांमध्ये भारतीय संघ हा वयाने सर्वात लहान संघ होता.

सत्कारप्रसंगी आमदार डावखरे यांनी युवा जलतरणपटूंना श्री विठ्ठल-रुक्मिणींची मूर्ती भेट देत शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंनी भारताचा तिरंगा आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने फडकावला असून भविष्यातही ते देशाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्या मार्गदर्शनाचेही त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे उपाध्यक्ष राजेश मोरे, धनंजय कुलकर्णी, रवी काळे, वैभव देशमुख, संतोष मोरे यांच्यासह जलतरणप्रेमी उपस्थित होते.

# वीर जवान फाउंडेशनतर्फे कारगिल विजय दिवसाचा भव्य सोहळा; १४ वीरांगनांचा प्रत्येकी ५० हजारांनी केला गौरव

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

वीर जवान फाउंडेशनच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात रविवारी कारगिल विजय दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला शौर्य, सन्मान आणि राष्ट्रभक्तीचा भव्य सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाला पद्मश्री पार्श्वगायक शंकर महादेवन, अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे, एनएसजी ब्लॅक कॅट कमांडो कर्नल अभिषेक कुमार, मेजर इंद्रजीत सिंह, कर्नल रानडे, वीर जवान फाउंडेशनचे संस्थापक विजय नाहटा, (माजी सनदी अधिकारी), अभिनेते केतन करांडे, शौर्यचक्र विजेते मधुसूदन सुर्वे, वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे (निवृत्त , भारतीय सेना)तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, वीरांगना, वीरमाता, एनसीसी कॅडेट्स आणि देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






कार्यक्रमातील सर्वात प्रेरणादायी क्षण म्हणजे १४ वीरांगनांचा विशेष सन्मानकरण्यात आला.त्यांच्या पतींच्या सर्वोच्च बलिदानाला मानवंदना म्हणून प्रत्येक वीरांगनेला ५०,००० इतकी आर्थिक मदत प्रदान करण्यात आली. हा सन्मान केवळ आर्थिक सहाय्य नसून, संपूर्ण राष्ट्राच्या कृतज्ञतेचे आणि त्यांच्या त्यागाविषयीच्या सर्वोच्च आदराचे प्रतीक ठरला.यानंतर पद्मश्री शंकर महादेवन यांनी आपल्या सुरेल आणि राष्ट्रभक्तीने भारलेल्या गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. अनेक वीरांगना, वीरमाता आणि उपस्थित नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरंगले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणारे सर्व मान्यवर, स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स, प्रायोजक, सामाजिक संस्था आणि उपस्थित सर्व देशप्रेमी नागरिकांचे वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे (निवृत्त ,भारतीय सेना) यांनी आभार मानले.

# कसब्यात किराणा दुकान फोडले ६० हजारांचा माल लंपास

## साखर, तेल आणि मसाल्याच्या गोण्यांवर अज्ञात चोरट्यांचा दरोडा; पोलिसांत गुन्हा दाखल

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील कसबा येथील 'रफिक मार्ट' या किराणा मालाच्या दुकानात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे ६० हजार ३४० रुपये किमतीचा किराणा माल चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना शनिवारी, २५ जुलै रोजी रात्री १०:०० ते रविवारी, २६ जुलै रोजी सकाळी ८:३० या कालावधीत घडली. मिळालेल्या माहितीनुसार, कसबा उभा मोहल्ला येथील रहिवासी मुमताज रफिक मेमन (वय ४६) यांचे कसबा येथे 'रफिक मार्ट' नावाचे किराणा दुकान आहे. शनिवारी रात्री दुकान बंद केल्यानंतर, रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश करून दुकानातील महागडा किराणा माल लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. चोरीस गेलेला माल - चोरट्यांनी दुकानातून खालील वस्तू लांबविल्या आहेत. साखर: ४,००० रुपये किमतीच्या ५० किलो वजनाच्या २ गोण्या मिरची: १६,००० रुपये किमतीची ३५ किलो वजनाची २ पोती जिरा ६,००० रुपये किमतीची ३० किलो वजनाची १ बॅग , जेमिनी सनफ्लॉवर तेल १०,२०० रुपये किमतीचे ८०० मिलीचे ५ बॉक्स (एकूण ६० पाकिटे) आणि ७,७४० रुपये किमतीच्या १३ किलोच्या ३ बरण्या , राजा सोया तेल ८,८०० रुपये किमतीच्या १३ किलोच्या ४ बरण्या इतर किराणा सामान: सुमारे ७,६०० रुपयांचे इतर साहित्य रविवारी सकाळी दुकान उघडल्यानंतर चोरीचा हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी दुकानाच्या मालकीण मुमताज मेमन यांनी संगमेश्वर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संगमेश्वर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या चोरीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

# आंदोलनातील विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घ्या; राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तहसीलदारांना निवेदन




**कर्जत । प्रतिनिधी**

दिल्ली येथे आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले पोलीस गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कर्जत शहर कमिटीने तहसीलदार यांच्यामार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे केली.कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे यांनी निवेदनात विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दिल्ली येथे युवक विद्यार्थी मित्रांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमारानंतर अनेक विद्यार्थ्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला असून, त्यामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.आंदोलन सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे मागे घेण्यात यावेत, त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप रद्द करण्यात यावेत तसेच पोलीस ठाण्यात असलेली त्यांची कागदपत्रे व इतर साहित्य परत देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.या मागण्यांची शासन स्तरावर तातडीने दखल घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने कर्जतमध्ये तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.यावेळी शहर उपाध्यक्ष राम देशमुख आणि कार्यकर्ते पदाधिकारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॉफी विथ कार्टूनिस्ट खुला पॉडकास्ट ठरला व्यंगचित्र रसिकांसाठी मेजवानी

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी म्हणी आणि वाक्प्रचार नव्या पिढीपर्यंत हसत-खेळत पोहोचविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या 'चित्रमय म्हणी आणि वाक्प्रचार' या पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त सांताक्रूझ येथील ओला वाकोला बँक्वेट हॉलमध्ये 'कॉफी विथ कार्टूनिस्ट्स' हा खुला पॉडकास्ट नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला व्यंगचित्र रसिकांनी भरपूर प्रतिसाद दिला.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. याप्रसंगी पुस्तकाचे संपादक संजय मिस्त्री, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, पुस्तकाचे निर्माते संदेश चव्हाण आणि ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.जुन्या मराठी म्हणी वाक्प्रचारांना व्यंगचित्रांच्या माध्यमातून जिवंत करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. याच संकल्पनेतून हा खुला पॉडकास्ट घेण्यात आला, अशी माहिती आयोजक आणि ओला वाकोलाचे सीईओ तसेच कार्टूनिस्ट्स कॅफे क्लबचे विद्यार्थी असलेले संदेश चव्हाण यांनी दिली. या पॉडकास्टमध्ये गेली चार दशके व्यंगचित्र क्षेत्रात कार्यरत असलेले प्रशांत कुलकर्णी आणि संजय मिस्त्री यांनी पुस्तकातील चित्रांमागील कल्पना, त्यांचा अर्थ आणि व्यंगचित्रकलेतील विविध अनुभव रसिकांसमोर मांडले. जागतिक दर्जाच्या पॉडकास्ट सेटअपमध्ये झालेल्या या संवादामुळे भर पावसातही श्रोते तब्बल अडीच तास खिळून बसले होते.कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रशांत कुलकर्णी, विवेक प्रभूकेळूसकर आणि उमेश कवळे या प्रसिद्ध व्यंगचित्रकारांनी लाईव्ह व्यंगचित्र रेखाटनाचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी प्रशांत कुलकर्णी यांनी शरद पवार यांचे अर्कचित्र काढताना त्यांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सांगता सुप्रसिद्ध अर्कचित्रकार प्रभाकर वाईरकर यांचे लाईव्ह अर्कचित्र रेखाटून संजय मिस्त्री यांनी केली.या कार्यक्रमाला 'महाराष्ट्र टाइम्स'चे संजीव साबडे, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, मराठी चित्रपट दिग्दर्शक आचरेकर, संगीतकार स्वरूप होनप, जादूगार सागर पटेल यांच्यासह अनेक डॉक्टर, अभियंते आणि व्यंगचित्रप्रेमी उपस्थित होते.कार्यक्रमानंतर ओला वाकोला रेस्टॉरंटतर्फे उपस्थितांना भोजनाची मेजवानी देण्यात आली. अनेक व्यंगचित्रकार एकत्र आल्याने हा कार्यक्रम छोटेखानी व्यंगचित्रकार संमेलनासारखा भासला, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.



दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५